-: प्रेसनोट दिनांक - ०५/०७/२०२५ :-

आरोपी लोकसेवक निता शिवाजी कांबळे, वय -५७ वर्षे, व्यवसाय - नोकरी पद - सहायक फौजदार, वर्ग - ३, गडहिंग्लज पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर सद्या रा. केडीसी बँक कॉलनी ५६/५७ डावी बाजू ३ री गल्ली, गडहिंग्लज यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........

---

यातील तक्रारदार यांचे मुलाचे विरूध्द गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे अपघात प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यामध्ये तक्रारदार यांचे वाहन जप्त करण्यात आलेले होते. सदर वाहन सोडविण्यासाठी रूपये ६०,०००/-लाच मागणी होत असलेबाबत तक्रारदार यांनी महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वेबसाईटवर तक्रार दिली होती या तक्रारीच्या पुढील कारवाईसाठी मा.पोलीस अधीक्षक ला.प्र.विभाग पुणे यांनी कोल्हापूर युनिटकडे तक्रार पाठविली होती. त्या अनुषंगाने तक्रारदार यांच्याशी संपर्क केला असता तक्रारदार यांनी सफौ निता मॅडम यांनी मो.नं.९५६१४४५३३१ या नंबरवरून कॉल करून गडहिंग्लज पोलीस ठाणेस तक्रारदार यांचे मुलाच्या विरूध्द दाखल गुन्हयातील फोर व्हिलर कार परत देण्यासाठी, एफ.आय.आर मधील कलम कमी करण्यासाठी व एफ.आय.आर ची प्रत देण्याकरिता एकुण ६०,०००/-रू ची लाचेची मागणी केली होती. त्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे मसफौ निता शिवाजी कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या ६०,०००/- रूपयांच्या लाच मागणीस दुजोरा देवुन तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ४०,०००/- रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष मसफौ निता शिवाजी कांबळे यांनी मागणी केलेप्रमाणे ४०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी निता शिवाजी कांबळे, वय - ५७ वर्षे, व्यवसाय - नोकरी पद - सहायक फौजदार अभियंता, वर्ग - ३, गडहिंग्लज पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर सद्या रा. केडीसी बँक कॉलनी ५६/५७ डावी बाजू ३ री गल्ली, गडहिंग्लज यांचेविरूध्द गडहिंग्लज पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक,कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार, श्री राजेंद्र सानप, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ.संदिप काशीद, म.पो.हे.कॉ. संगिता गावडे, पो.हे.कॉ. सुधीर पाटील, पो.कॉ. संदीप पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील, चालक चा.पो.कॉ. प्रशांत दावणे, ला.प्र.वि.कोल्हापूर ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.